भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१३-१४/१०५
आयडीएमडी.पीसीडी. ४/१४.०१.०२/२०१३-१४ जुलै १, २०१३

मार्केटमधील सर्व सहभागी

महोदय/महोदया

**महापरिपत्रक - वाणिज्यिय कागदपत्र देण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

कमर्शियल पेपर (सीपी) हा एखाद्या प्रॉमेसरी नोटेच्या स्वरुपात दिला जाणारा वित्तबाजारातील एक प्रतिभूतित संलेख असून भारतात १९९० मध्ये त्याची सुरुवात झाली. त्याचा उद्देश म्हणजे, उच्च रेटिंग असलेल्या कॉर्पोरेट कर्जदारांना त्यांच्या लघुमुदतीच्या कर्ज स्त्रोतांची वैविध्यपूर्ण गुंतवणुक करणे आणि गुंतवणुकदारांना एक अतिरिक्त संलेख उपलब्ध करुन देणे हा आहे..

२. बाजारात भाग घेणारांच्या व इतर संबंधितांच्या संदर्भासाठी, ह्या विषयावरील सर्व विद्यमान मार्गदर्शक तत्वे/सूचना/निदेश समाविष्ट करुन एक महापरिपत्रक तयार करण्यात आले हाहे. येथे नोंद घ्यावी की, सीपी देण्याशी संबंधित असलेल्या, आणि जोडपत्रात दिलेल्या परिपत्रकातील सर्व सूचना/मार्गदर्शक तत्वे/ अधिसूचना ह्या महापरिपत्रकात अद्यावत व समाविष्ट करण्यात आली आहेत. हे महापरिपत्रक रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही www.mastercirculars.rbi.org.in टाकण्यात आले आहे.

आपला,

(के.के.वोहरा)
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

सह. वरील प्रमाणे;

| | अनुक्रमणिका | |
|---|---|---|
| **अनु क्र.** | विषय | |
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | पात्रता | ३ |
| ३ | सीपी देणे  क्रेडिट वाढविणे, मर्यादा इत्यादि | ३ |
| ४ | सीपीमध्ये गुंतवणुक करण्यासाठी पात्रता | ४ |
| ५ | संलेखाचे स्वरुप, देण्याची रीत व विमोचन | ४ |
| | (५.१) फॉर्म | ४ |
| | (५.२) मुदत | ५ |
| | (५.३) देण्याची रीत | ५ |
| | (५.४) रेटिंगची आवश्यकता | ५ |
| | (५.५) गुंतवणुक/विमोचन | ५ |
| | (५.६) कागदपत्रे ठेवण्याच्या रीती | ६ |
| ६ | सीपींचे ट्रेडिंग व तडजोड | ६ |
| ७ | सीपीचे बायबॅक | ६ |
| ८ | कर्तव्ये आणि दायित्वे | ६ |
| ९ | इतर काही निदेश लागु न होणे | ७ |
| | शेड्युल्स - | |
| | शेड्युल १ - सीपीचा नमुना/मसुदा | ८ |
| | शेड्युल २ - आयपीए प्रमाणपत्र | १० |
| | शेड्युल ३ - सीपीचे पुनर् प्रदान करण्यामधील कसुरींची माहिती | १० |
| | शेड्युल ४ - सीपीचे बायबॅक कळविणे | १२ |
| | व्याख्या | १३ |
| | परिशिष्ट  एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी | १४ |

## १. प्रस्तावना

वाणिज्यिय कागदपत्र (सीपी) हे वचनपत्राच्या स्वरूपात देण्यात येणारे बाजारपेठेतील एक असुरक्षित आर्थिक दस्तऐवज आहे. अत्यंत उच्च नामांकन असलेल्या कॉर्पोरेट कर्जदारांना त्यांच्या अल्प मुदतीच्या कर्जाचे स्रोत वेगवेगळ्या प्रकारे दर्शवता यावेत आणि गुंतवणूकदारांना आणखी साधन मिळावे, ह्यासाठी भारतामध्ये १९९० मध्ये वाणिज्यिय कागदपत्र म्हणजेच सीपी खाजगी दस्तऐवज (साधन) म्हणून आणले आले. त्यानुसार, प्राथमिक वितरक (पीडीज) आणि अखिल भारतीय वित्तासंस्थांनाही त्यांच्या अल्प मुदतीच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सीपी देण्याची अनुमती देण्यात आली. तत्काळ संदर्भ घेता यावा, ह्यासाठी सीपी देण्याच्या मार्गदर्शक सूचना अद्ययावत सुधारणांसह पुढे दिलेल्या आहेत.

## २. सीपी - देण्यासाठीची पात्रता

(अ) कंपन्या, पीडी आणि वित्तसंस्थांना सीपींच्या मार्फत लघु मुदतीचे स्त्रोत उभारण्यास परवानगी आहे.
(ब) पुढील अटी पूर्ण केल्या असल्यासच एखादी कंपनी सीपी देण्यास पात्र असेल.

(१) त्या कंपनीचे मूर्त निव्वळ मूल्य, तिच्या अलिकडील ताळेबंदानुसार रु. ४ कोटीपेक्षा कमी नसावे
(२) बँका किंवा वित्तसंस्थांद्वारे त्या कंपनीला कार्यकारी भांडवल मर्यादा मंजुर केलेली असावी, आणि
(३ ) त्या कंपनीचे कर्जखाते, वित्तपुरवठा करणा-या बँके/संस्थेद्वारे स्टॅंडर्ड ॲसेट म्हणून वर्गीकृत केलेले असावे.

## (३) सीपी देणे क्रेडिटमध्ये वाढ, मर्यादा इत्यादि

(अ) सीपी ही एक स्टॅंड अलोन उत्पाद ह्या स्वरुपात दिली जाईल. ह्याशिवाय, सीपीच्या प्रचालकांना स्टॅंड बाय सुविधा देण्याबाबतचे कोणत्याही प्रकारचे दायित्व बँका व वित्तसंस्थांवर असणार नाही.
(ब) बँका व वित्तसंस्था, त्यांच्या वाणिज्य अंदाजावर आधारित, त्यांना लागु असलेल्या प्रुडेंशियल नॉर्म्सचे पालन करुन, व त्यांच्या संचालक मंडळाची नेमकी मंजुरी घेऊन, सीपी देण्यासाठी क्रेडिट मध्ये वाढ करुन, स्टॅंड बाय मदत/क्रेडिट, बॅक-स्टॉप सुविधा देऊ शकतात.
(क) बॅंक नसलेल्या संस्था (कॉर्पोरेट्स सह), एखाद्या सीपी प्रचालनासाठी क्रेडिट वाढीसाठी विना-अटीची व बदलू न शकणारी हमी देऊ शकतात - मात्र त्यासाठी पुढील अटी आहेत

(१) सीपी देण्यासाठी विहित केलेले पात्रतेचे निकष प्रचालकाने पूर्ण केलेले असावेत.
(२) त्या हमीदाराकडे, प्रचालकापेक्षा एक स्तर वर असलेले, एखाद्या मंजुरीप्राप्त सीआरएने दिलेले क्रेडिट रेटिंग असावे. आणि
(३) त्या सीपीच्या ऑफर डॉक्युमेंटमध्ये, हमीदार कंपनीचे निव्वळ मूल्य, त्या हमीदार कंपनीने अशा हमी दिल्या आहेत अशा कंपन्यांची नावे, हमीदार कंपनीने दिलेल्या हमींची व्याप्ती, त्या हमीचे आवाहन करणा-या अटी स्पष्टपणे दिलेल्या असाव्यात.

(ड) एखाद्या प्रचालकाद्वारा, दिल्या जाऊ शकणा-या सीपींची एकूण रक्कम नेहमीच त्याच्या संचालक मंडळाने मंजुर केलेली मर्यादा किंवा त्या विशिष्ट रेटिंगसाठी सीआरएने निर्देशित केलेली रक्कम (ह्यापैकी कमी असेल ते) ह्याच्या आत असावी.
(ई) त्या कंपनीच्या अर्थसहाय्याची स्त्रोत-रचना (रिसोर्स पॅटर्न) हिशेबात घेऊन (सीपीसह) कार्यकारी भांडवलाच्या

मर्यादा ठरविण्याबाबत बँका व वित्तसंस्थांना लवचिकता ठेवता येईल.

(फ) एखाद्या वित्तसंस्थेने केलेले सीपीचे प्रचालन, भारतीय रिझर्व बँकेच्या डीबीओडीने, वेळोवेळी सुधारित/अद्यावत केलेल्या, रिसोर्स रेझिंग नॉर्म्स फॉर एफ आय वरील महापरिपत्रकात विहित केलेल्या अंब्रेला लिमिटच्या आत असाव्यात.

(ग) प्रचालन करावयाच्या सीपीची एकूण रक्कम, तो प्रचालक, वर्गणीसाठी इश्यु प्रचलित करावयाच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या कालावधीत उभी केली जावी. सीपी, केवळ एकाच तारखेस किंवा अगतः निरनिराळ्या तारखांना देता येऊ शकते, परंतु दुस-या पर्यायात प्रत्येक सीपीची परिपक्वता तारीख तीच असेल.

(ह) सीपीचे प्रत्येक प्रचालन व सीपीचे प्रत्येक नूतनीकरण हे एक नवीन प्रचालन असल्याचे समजले जाईल.

## (४) सीपीमध्ये गुंतवणुक करण्यासाठी पात्रता

(अ) व्यक्ती, बँका, इतर कॉर्पोरेट संस्था (भारतात पंजीकृत किंवा सुसंस्थापित झालेल्या), व सुसंस्थापित न झालेल्या संस्था, अनिवासी भारतीय, आणि विदेशी संस्थात्मक निवेशक/एफ आय आय) सीपीमध्ये निवेश करण्यास पात्र असतील.

(ब) एफ आय आय पुढील अटींवरच सीपीमध्ये गुंतवणुक करु शकतील

(१) सेबीने त्यांच्यासाठी घातलेल्या अटींनुसार, आणि

(२) फेमा १९९९, विदेशी मुद्रा (ठेवी) विनियम २००० आणि वेळोवेळी सुधारित विदेशी मुद्रा व्यवस्थापन (भारताबाहेरील रहिवासी व्यक्तीद्वारे प्रतिभूती देणे किंवा हस्तांतरण) विनियम २००० च्या तरतुदींचे अनुपालन केले असल्यास.

## (५) संलेखाचे स्वरुप, प्रचालनाची व विमोचनाची रीत

### (५.१) स्वरुप

(अ) सीपी ही एखाद्या प्रॉमिसरी नोटेच्या स्वरुपातच (ह्या मार्गदर्शक तत्वांमधील शेड्युल १ मध्ये विहित केल्याप्रमाणे) दिली जाईल आणि ती प्रत्यक्ष स्वरुपात किंवा सेबीने मान्यता दिलेल्या व पंजीकृत झालेल्या कोणत्याही एका डिपॉझिटरी मार्फत डिमॅट स्वरुपात धारण करता येईल. मात्र आरबीआयद्वारा नियंत्रित केलेल्या संस्था, अशा कोणत्याही डिपॉझिटरीज् मार्फत केवळ डिमॅट स्वरुपातच सीपी धारण करु शकतील किंवा त्यात व्यवहार करु शकतील.

(ब) आरबीआयद्वारा नियंत्रित अशा सर्व संस्थांद्वारे केलेल्या नवीन गुंतवणुकी केवळ डिमॅट स्वरुपातच केल्या जातील.

(क) सीपी केवळ रु. ५ लाख व त्याच्या पटीतच दिल्या जातील. एकाच निवेशकाने गुंतवणुक केलेली रक्कम रु. ५ लाखांपेक्षा (दर्शनी मूल्य) कमी असू नये.

(ड) प्रचालकाने ठरविल्यानुसार दर्शनी मूल्यावर सूट देऊन सीपी दिली जाईल.

(ई) कोणताही प्रचालक सीपीच्या इश्युचे अंडररायटिंग किंवा सह स्वीकार करणार नाही.

(फ) सीपीवर पर्याय (कॉल/पुट) करण्यास परवानगी नाही.

**(५.२) मुदत**

(अ) प्रचालनाच्या तारखेपासून किमान ७ दिवसांच्या किंवा कमाल १ वर्षापर्यंतच्या मुदतीसाठी सीपी दिली जाऊ शकते.

(ब) सीपीची परिपक्वता तारीख ही, प्रचालकाचे क्रेडिट रेटिंग वैध असण्याच्या तारखेपलिकडे असू नये.

**(५.३) देण्याची कार्यरीत**

(अ) प्रत्येक प्रचालकाने सीपी देण्यासाठी एका आयपीएची नेमणूक करणे आवश्यक आहे.

(ब) प्रमाणभूत बाजार-रीतींनुसार, प्रचालकाने त्याच्या भावी निवेशकांसाठी, त्याची अलिकडील आर्थिक स्थिती निर्देशित केली पाहिजे.

(क) प्रचालक व निवेशक ह्यामधील सौद्याला दुजोरा मिळाल्यावर, प्रचालक आयपीएच्या मार्फत, डिपॉझिटरीमध्ये निवेशकाच्या डिमॅट खात्यात ती सीपी जमा करण्याची व्यवस्था करील.

(ड) प्रचालकाचा आयपीएबरोबर वैध करार झाला असून सर्व कागदपत्र व्यवस्थित आहेत अशा आयपीए प्रमाणपत्राची एक प्रत, प्रचालक निवेशकाला देईल. (शेड्युल २)

**(५.४) मानांकनाची आवश्यक्ता**

पात्र असलेले सहभागी/प्रचालक, सीपी देण्यासाठी, सेबीमध्ये पंजीकृत झालेल्या कोणत्याही एका सीआरएकडून क्रेडिट रेटिंग मिळवू शकतात. सेबीद्वारा विहित केलेली व्याख्या व रेटिंगचे चिन्ह ह्यानुसार असे किमान रेटिंग ए३ असेल. सीपीच्या प्रचालनाच्यावेळी प्रचालक खात्री करुन घेतील की ते रेटिंग विद्यमान/चालु असून पुनरावलोकनामुळे खाली आलेले नाही.

**(५.५) गुंतवणुक/विमोचन**

(अ) सीपीमधील निवेशक (प्राथमिक वर्गणीदार), आयपीएच्या मार्फत, प्रचालकाच्या खात्यामध्ये त्या सीपीची डिसकाऊंट केलेली रक्कम अदा करील.

(ब) प्रत्यक्ष स्वरुपात सीपी धारण करणारा निवेशक, ती परिपक्व झाल्यावर तो संलेख आयपीएमार्फत प्रचालकाला प्रदानासाठी सादर करेल.

(क) डिमॅट स्वरुपामधील सीपी धारक त्या सीपीचे विमोचन करुन आयपीएमार्फत प्रदान मिळवील.

**(५.६) कागदपत्रांबाबत कार्यरीती**

(अ) फिक्सड् इनकम मनी मार्केट अँड डेरिवेटिवज् असोशिएशन ऑफ इंडिया (एफ आय एम एम डीए) ह्यांच्याशी सल्लामसलत करुन व सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय रीतींना अनुसरुन, सीपींसाठी प्रमाणभूत कार्यरीती व कागदपत्रे विहित करण्यात आली आहेत.

(ब) प्रचालक/आयपीए, आरबीआयच्या मंजुरीनुसार वेळोवेळी एफआयएमएमडीएने दिलेल्या कार्यकारी मार्गदर्शक तत्वांचे पालन करतील.

**(६)सीपींचे ट्रेडिंग व तडजोड**

सीपीमधील सर्व ओटीसी व्यवहार, तो व्यवहार केल्यानंतर १५ मिनिटांच्या आत एफआयएमएमडीएच्या रिपोर्टिंग प्लॅटफॉर्मवर कळविले जातील.

(ब) सीपीमधील ओटीसी व्यवहार, नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या (एन एस इ) समाशोधन गृहामार्फत म्हणजे, नॅशनल सिक्युरिटिज क्लियरिंग कॉर्पोरेशन लि. (एनएससीसीएल), बँबे स्टॉक एक्सचेंजचे (बी एस ई) समाशोधन गृह म्हणजे एमसीएक्स-एमएक्स क्लियरिंग कॉर्पोरेशन लि. (सीसीएल) मार्फत, एनएससीसीएल, आयसीसीएल, आणि सीसीएल ह्यांनी वेळोवेळी दिलेल्या नॉर्म्सनुसार तडजोड केले जातील.

(क) सीपीमधील ओटीसी व्यवहारांसाठीचे तडजोड चक्र टी + ० किंवा टी + १ असे असेल.

**(७)सीपीचे बाय-बॅक (पुनर्खरेदी)**

(अ) प्रचालक, त्यांनी निवेशकांना दिलेल्या सीपीची तिच्या परिपक्वतेपूर्वी पुनर्खरेदी (बाय बॅक) करु शकतात.

(ब) सीपीचे बायबॅक, सेकंडरी मार्केट मार्फत त्यावेळी विद्यमान असलेल्या बाजार मूल्याने केले जाऊ शकते.

(क) सीपीचे बायबॅक, ती दिल्याच्या किमान ७ दिवसांपूर्वी करता येणार नाही.

(ड) केलेल्या बायबॅक बाबत प्रचालकाने आयपीएला कळविले पाहिजे.

(ई) सीपीचे बायबॅक, संचालक मंडळाची मंजुरी मिळविल्यानंतरच करता येईल.

**(८) कर्तव्ये आणि दायित्वे**

प्रचालक, आयपीए व सीआरए ह्यांची कर्तव्ये व दायित्वे पुढीलप्रमाणे आहेत

(१) प्रचालक

प्रचालक खात्री करुन घेईल की सीपी देण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे व कार्यरीतींचे काटेकोरपणे करण्यात आले आहे.

(२) आयपीए

(अ) आरबीआयद्वारे निर्धारित करण्यात आलेले किमान कर्ज नामांकन इश्यु करणा-या कंपनीस प्राप्त आहे आणि सीपी देण्यामधून दिली जाणारी रक्कम सीआरएद्वारे विशिष्ट नामांकनासाठी किंवा त्यांच्या संचालक मंडळाने मान्य केलेल्या रकमेपेक्षा (ह्यापैकी कमी असेल ते) कमी आहे, ह्याची खात्री करण्याची जबाबदारी आयपीएवर असेल.

(ब) प्रचालकाबरोबर वैध करारपत्र केले असल्याचे प्रचालक प्रमाणित करील (शेड्युल २)

(क) प्रचालकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी आयपीए करील (म्हणजे, संचालक मंडळाच्या ठरावाची प्रत, अधिकृत एक्झिक्युटंटची सही (सीपी प्रत्यक्ष स्वरुपात असल्यास) ही व्यवस्थित आहेत) आणि तसे प्रमाणपत्र देईल.

(ड) मूळ कागदपत्रांच्या आयपीएद्वारे तपासल्या गेलेल्या प्रमाणित प्रती आयपीच्या ताब्यात ठेवण्यात येतील.

(ई) तसेच, आयपीएज म्हणून कार्यरत असलेल्या सर्व अनुसूचित बँकांनी सीपी देण्याबद्दलची माहिती ऑनलाईन रिटर्न्स फिलिंग सिस्टीम (ओआरएफएस) मॉड्युलवर सीपी देण्यात आल्यानंतर दोन दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(फ) सीपीचे पुनर्प्रदान करण्यात कसुरी झाल्याचे आढळून आल्यास त्याबाबतची माहिती ताबडतोब, मुख्य महाव्यवस्थापक, वित्तीय बाजार विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई ४०० ००१ (ई मेल) ह्यांना, ह्या मार्गदर्शक तत्वांच्या शेड्युल ३ मध्ये दिलेल्या नमुन्यात कळवितील.

(ग) आयपीए, प्रचालकाने केलेल्या सर्व बाय बॅकचे प्रसंगही, मुख्य महाव्यवस्थापक, वित्तीय बाजार विभाग, भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, फोर्ट, मुंबई ४०० ००१ ह्यांना, (ई मेल) ने, ह्या मार्गदर्शक तत्वांच्या शेड्युल ४ मधील नमुन्यामध्ये कळवितील.

**(३)सीआरए**

(अ) भांडवल बाजारपेठ दस्तऐवज घेण्यासाठीच्या नामांकनासाठी सेबीद्वारे सीआरएजवर लागू केलेली आचारसंहिता सीपीच्या नामांकनासाठी सीआरएजवर लागू असेल.

(ब) इथून पुढे इश्यु देणा-या कंपनीच्या सक्षमतेबद्दल असलेल्या आकलनानुसार सीआरएज नामांकनाच्या वैधतेचा कालावधी त्यांच्या निर्णयानुसार निश्चित करू शकतात. त्यानुसार, नामांकनाचे पुनरावलोकन करण्याचा दिनांक नामांकन कधीपर्यंत लागू राहील, ह्याचा दिनांक त्यांनी स्पष्ट प्रकारे नमूद करणे आवश्यक आहे.

(क) प्रचालकांना देण्यात आलेल्या रेटिंगवर, त्यांच्या कामगिरीनुसार, सीआरए जवळून देखरेख ठेवतील आणि अशा रेटिंगमधील बदल, ते प्रकाशने व वेबसाईटद्वारा सार्वजनिक करतील.

## ९. अन्य काही निर्देश लागू नसण्याची स्थिती

अबँकीय वित्तीय कंपन्या, सार्वजनिक ठेवींचा स्वीकार (रिझर्व बँक) निदेश, १९९८ मध्ये दिलेली कोणतीही बाब, ह्या मार्गदर्शक तत्वानुसार कोणत्याही एनबीएफसीद्वारे, सीपी देऊन ठेव स्वीकारण्याला लागु होणार नाही.

**१०.** ह्या मार्गदर्शक सूचनांमध्ये देण्यात आलेल्या काही विशिष्ट संकल्पनांच्या **व्याख्या जोडपत्रा** मध्ये देण्यात आल्या आहेत.

**शेड्युल १**
(परिच्छेद ५.१ अ पहा)

## कमर्शियल पेपरचा (सीपी) नमुना

ज्या राज्यात द्यावयाचा आहे तेथे जारी असल्यानुसार मुद्रांक लावावेत

(देणाऱ्या कंपनी/संस्थाचे नाव)

अनुक्रमांक

देण्याची जागा :______________________________ देण्याची तारीखः______________________________

परिपक्वतेची तारीखः_____________________________________ सूट/सवलतीचे दिवस सोडून

(अशा तारखेस सुट्टी असल्यास त्या आधीच्या कामाच्या दिवशी प्रदान केले जावे)

प्राप्त झालेल्या मूल्यासाठी _______________________________________________ ही संस्था
(देणाऱ्या कंपनी/संस्थाचे नाव)

____________________________________________ ह्यांना किंवा तिचा आदेश धारक (गुंतवणुकदाराचे नाव) ह्यांना, वर दिलेल्या परिपक्वतेच्या तारखेस, ........... ह्यांना (देणाऱ्या प्रदानकरणाऱ्या एजंटाचे नाव) हा कमर्शियल पेपर सादर किंवा दिल्यावर रु .....(रुपये........) एवढी रक्कम देण्याचे वचन देत आहे.________________________________________________

करिता आणि च्या वतीने ________________________________________________
(देणाऱ्या कंपनी/संस्थांचे नाव)

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता

ह्या कमर्शियल पेपर सर्व सह्या (एंडॉर्समेंट्स) स्वच्छ व स्पष्ट असाव्यात प्रत्येक एंडॉर्समेंट तिच्यासाठी ठेवलेल्या जागेत करावी

ह्यात निर्देशित केलेली रक्कम______________________________
ह्यांना (हस्तांतरित झालेल्याचे नाव)
किंवा त्याच्या आदेशितीला देण्यात यावी.

करिता आणि च्या वतीने

______________________________

(हस्तांतरकर्त्यांचे नाव)

______________________________

१. ‘

२. ‘

**शेड्युल II**
(परिच्छेद १४ पहा)

**आयपीए प्रमाणपत्र**

आम्ही, ____________________________________________ ह्यांचेबरोबर
(देणारी संस्था/कंपनीचे नाव)
वैध करारनामा केला आहे.

२. आम्ही सर्व कागदपत्रे, उदा. मंडळाचा ठराव, आणि________________________________________________ (कंपनी/संस्थेचे नाव)

ह्यांनी दिलेले क्रेडिट रेटिंग कंपनीचे प्रमाणपत्र पडताळून पाहिली आहेत. आणि प्रमाणित करतो की ते कागदपत्र व्यवस्थित आहेत. मूळ कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती आमच्या ताब्यात ठेवल्या आहेत.

३. *आम्ही असेही प्रमाणित करतो की, अनुक्रमांक ____________________ दिनांक ____________________ व रु .____________________(रुपये ____________________________________________________)साठी असलेल्या, सोबत जोडलेल्या कमर्शियल पेपरमधील एक्सिक्युटंट्सच्या सह्या,. _____________________ ह्यांनी
(देणाऱ्या कंपनी/संस्थाचे नाव)
आम्हाला सादर केलेल्या नमुना सह्यांशी जुळणाऱ्या आहेत.

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता/स्वाक्षरीकर्ते
(देणाऱ्या व प्रदान करणाऱ्या एजंटचे नाव)

जागाः

दिनांक :

* (प्रत्यक्ष स्वरुपातील सीपीसाठी लागु) लागु नसेल ते खोडा

**शेड्युल III**

शेड्युल ३ (परिच्छेद ८.२ फ पहा)

**सीपीच्या परतफेडीबाबतच्या कसुरींची सविस्तर माहिती**

| देणाराचे नाव | सीपी इश्यु करण्याची तारीख | रक्कम (रु. कोटींमध्ये) | रक्कम परत करण्याची तारीख | सुरुवातीचे रेटिंग | आता चे रेटिंग | ह्या सीपी प्रचालनाला स्टँडबाय सहाय्य/क्रेडिट बँक स्टॉप सुविधा/हमी दिली गेली होती काय ? | तसे असल्यास, वरील स्तंभ (७) मधील सुविधा पुरविणाऱ्या संस्थेचे नाव. | वरील स्तंभ (७) मधील सुविधाचा मान राखून प्रदान केले गेले काय. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

(प्राधिकृत स्वाक्षरीकर्ते)

**शेड्युल ४**

(परिच्छेद ८.२ ग पहा)

| सीपींच्या बायबॅक संबंधीचा अहवाल | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| व्यापाराची तारीख | प्रचालक | आयएसआयएन | देण्याची तारीख | परिपक्वतेची तारीख | रक्कम (रु. कोटींमध्ये) | बायबॅकचे स्वरुप |
| | | | | | | |
| | | | | | | |
| # सीपीज प्रचालकाद्वारे बंद करण्यात आल्या होत्या काय हे निर्देशित करावे. | | | | | | |

(प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता)

**व्याख्या**

अन्य संदर्भ नसल्यास ह्या मार्गदर्शक तत्वांमध्येः

(अ) आरबीआय म्हणजे भारतीय रिझर्व बँक

ब) 'बँक' म्हणजे, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा१०) च्या कलम ५ च्या खंड (सी) मध्ये व्याख्या केलेली बँकिंग कंपनी किंवा त्याच्या खंड (डीए) , खंड (एनसी) आणि खंड (एनडी) मध्ये अनुक्रमे, 'कॉरेस्पाँडिंग न्यू बँक', 'भारतीय स्टेट बँक' किंवा 'सहाय्यक/दुय्यम बँक' आणि त्यात, त्या अधिनियमाच्या कलम ५६ सह वाचित, कलम ५ च्या खंड (सीसीआय) मध्ये व्याख्या केलेली 'सहकारी बँक' ही समाविष्ट आहे.

(क) 'अनुसूचित बँक' म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या दुसऱ्या शेड्युलमध्ये समाविष्ट असलेली बँक.

(ड) 'अखिल भारतीय वित्तीय संस्था (एफआय)' म्हणजे एक्सपोझर नॉर्म्सवरील वेळोवेळी सुधारित आरबीआयचे महापरिपत्रक डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.३/१३.०३.००/२०१२-१३ दि. जुलै २, २०१२ च्या

जोडपत्र ३ मध्ये दिलेल्या यादीमधील अखिल भारतीय वित्तीय कंपनी.

(ई) 'प्राथमिक डीलर'(पीडी) म्हणजे, वेळोवेळी सुधारित 'सरकारी सिक्युरिटी बाजारातील प्राथमिक डीलर्ससाठी असलेली मार्गदर्शक तत्वे' दि. मार्च २९, १९९५ अनुसार, एक प्राथमिक डीलर म्हणून प्राधिकरणपत्र मिळविली असलेली एक अबँकीय वित्तीय कंपनी (एनबीएफसी).

फ) कंपनी' म्हणजे, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३ मध्ये व्याख्या केलेली कंपनी

ग) 'अबँकीय कंपनी' म्हणाजे, बँकिंग कंपनी सोडून अन्य कंपनी. इश्युईंग अँड पेयिंग एजंट (आयपीए) म्हणजे, आयपीए म्हणून कार्य करणारी अनुसूचित बँक

ह) सीआरए म्हणजे, सेबीकडे पंजीकृत झालेली क्रेडिट रेटिंग एजन्सी.

(आय) सीपी म्हणजे ह्या महापरिपत्रकातील मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन दिलेला कमर्शियल पेपर

(जे) येथे वापरण्यात आलेले आणि भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दसमूह ह्यांचा अर्थ, त्यांना ह्या अधिनियमात दिल्या गेलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

**परिशिष्ट**

## एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

| अनु. क्र | क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | आयडीएमडी.पीसीडी.२०/१४.०१.०२/२०११-१२ | मार्च ५, २०१२ | ठेवी प्रमाणपत्रे (सीडी) व कमर्शियल पेपर्स (सीपी) मधील ओटीसी व्यवहारांची तडजोड |
| २. | आयडीएमडी.पीसीडी.०७/१४.०१.०२/२०१२-१३ | जानेवारी १, २०१३ | कमर्शियल पेपर्स (सीपी) देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे. |
| ३. | आयडीएमडी.पीसीडी.१२/१४.०३.०२/२०१२-१३ | जून २६, २०१३ | ठेवी प्रमाणपत्रे (सीडी) व कमर्शियल पेपर्स (सीपी) मधील ओटीसी व्यवहारांची तडजोड |